माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये प्राप्त झालेले द्वितीय अपील

**अपील क्रमांक : ६८१/२०२२**

**अपिलार्थी – श्री. मनिष सुदाम खोब्रागडे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा, ता.जि. भंडारा**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग * नागपूर *

**प्रथम अपिलीय अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा, ता.जि. भंडारा**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २७.१०.२०२१ | निरंक | २९.११.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि. २७.१०.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "दि. २६.१०.२०२१ रोजी मा. कोर्ट विद्यमान कार्यकारी दंडाधिकारी, पवनी यांना सादर केलेल्या अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली याबाबत", माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कुठलाच प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. २९.११.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "मागितलेली माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दि. ०७.०३.२०२२** रोजी "मागितलेली माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही सुनावणी झाली नाही" असे

कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. ०९.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. ०८.०५.२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा, श्री. गजानन मेश्राम ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा, श्रीमती स्मिता बेलपत्रे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. मनिष सुदाम खोब्रागडे यांनी दि. २७.१०.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार त्यांनी दि. २६.१०.२०२१ रोजी मा. कोर्ट विद्यमान कार्यकारी दंडाधिकारी, पवनी यांना सादर केलेल्या अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली याचा तपशिल मागितला असता त्यावर कोरोना कालावधीतील अडचणीमुळे प्रतिसाद देण्यात आला नाही. वरील अर्ज हा अपिलार्थी यांच्या सेवापुस्तिकेशी संबंधित होता. त्यावर दाखल प्रथम अपील अर्जावर तत्कालीन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांच्यावतीने सुनावणी घेण्यात आली नाही मात्र अपिलार्थी यांचे सेवापुस्तक शोधून त्यांना प्रदान करण्याचे मौखिक निर्देश देण्यात आले. अपिलार्थी यांनी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केल्यानंतर व याची सुनावणी सूचना निर्गमित केल्यानंतर विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कार्यालयीन अभिलेखात अपिलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीचा शोध घेण्यासंबंधी निर्देश दिले व त्याअनुषंगाने संबंधित सेवापुस्तक आढळून आले. त्यानुसार अपिलकर्त्यांना अपेक्षित असणारी दस्तावेजाची प्रत त्यांना नोंदणीकृत टपालाद्वारे तसेच त्यांच्या whats app वर याआधीच पाठविण्यात आलेली आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, यात झालेला विलंब क्षमापित करावा ही विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली विनंती मान्य करित झालेला विलंब क्षमापित करित व अपिलार्थीना अपेक्षित असलेली माहिती प्रदान केली असल्याची सकारात्मक बाब लक्षात घेता, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

## आदेश

**प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०८.०५.२०२४**

जावक क्रमांक ----- E8LLO -----दिनांक 30 AUG 2024 ----------

c:\users\rma\desktop\prajakta\appeal order\8.5.2024\681-2022.docx